महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३१ वा | दिनांक : १९/१०/२०२४ | वार : शनिवार

## शरद पवार मुख्यमंत्री असताना दाऊद इब्राहिमला भेटले होते : प्रकाश आंबेडकर यांचा आरोप



**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषवताना कुख्यात अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याची दुबई विमानतळावर भेट घेतली होती, असा खळबळजनक आरोप वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी हा आरोप केल्यामुळे राज्याचे राजकारण चांगलेच तापण्याची शक्यता आहे.

बाबा सिद्दीकी यांच्या हत्येमुळे मुंबईतील गँगवॉरचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. त्यातच प्रकाश आंबेडकर यांनी शरद पवारांवर थेट अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमची भेट घेतल्याचा आरोप केला आहे.

### शरद पवारांच्या परदेश दौऱ्यांवर सवाल

प्रकाश आंबेडकर येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत म्हणाले, शरद पवार १९८८ ते १९९१ पर्यंत राज्याचे मुख्यमंत्री होते. या काळात ते एका परदेश दौऱ्यावर गेले होते. ते भारतातून लंडनला गेले. तेथून कॅलिफोर्नियाला त्यांनी २ दिवस मुक्काम केला. तिथे त्यांनी एक बैठकही घेतली. ही बैठक कुणासोबत झाली? हे स्पष्ट झाले पाहिजे.

कॅलिफोर्नियातून शरद पवार लंडनला व तेथून दुबईला आले. त्यांनी दुबई विमानतळावरच कुख्यात अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमची भेट घेतली. यावेळी दाऊदने पवारांना सोन्याचा हार भेट दिला. त्यानंतर सायंकाळच्या विमानाने पवार लंडनला गेले आणि तेथून २ दिवसांनी पुन्हा मायदेशी परतले.

देशातील कोणताही मुख्यमंत्री केंद्र सरकारच्या परवानगीशिवाय परदेश दौरा करू शकत नाही. त्यामुळे तत्कालीन केंद्र सरकारने शरद पवारांच्या दौऱ्याला मान्यता दिली होती का? कॅलिफोर्नियातील बैठक व दाऊदची भेट या दोन्ही घटनांना केंद्राची परवानगी होती का? दिली होती तर त्या भेटीचा अहवाल त्यांनी केंद्राला सुपूर्द केला होता का? याचा खुलासा विद्यमान केंद्र सरकारने केला पाहिजे. महाराष्ट्रात सुरू असलेल्या कॉन्ट्रॅक्ट किलिंगच्या मालिकेमुळे याचा खुलासा करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

### आपल्याला मागचा इतिहास पहावाच लागेल

महाराष्ट्रात शांतता राखण्यासाठी कोणत्या पक्षांना मतदान करायचे हे मतदारांनी ठरवले पाहिजे. मी निवडणुकीच्या तोंडावर मुद्दाम हे विधान करत आहे. महाराष्ट्रात शांतता प्रस्थापित होण्यासाठी केंद्र व राष्ट्रवादी काँग्रेस या गोष्टींचा खुलासा करेल असा माझा विश्वास आहे. मधल्या काळात बॉम्बस्फोट व गोळीबाराचे प्रकार थांबले होते. पण काही दिवसांपासून ते पुन्हा सुरू झालेत. बाबा सिद्दीकी यांची उघडपणे हत्या करण्यात आली. ही परिस्थिती पाहता आपल्याला मागचा इतिहास पाहावा लागेल. त्यामुळे केंद्रातील भाजप सरकारने जुने रेकॉर्ड बाहेर काढून शरद पवार व दाऊदच्या भेटीचा तपशील सार्वजनिक करावा.

माझे आजोबा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना १९५४ साली तत्कालीन केंद्र सरकारने गांभिर्याने घेतले नाही. त्यामुळे १९६२ चे युद्ध झाले. आगामी काळ अत्यंत कठीण राहणार आहे. त्यासाठी महाराष्ट्राच्या सत्तेत योग्य माणसे सत्तेत येणे गरजेचे आहे. असे झाले तरच भविष्यातील आव्हानाला तोंड देता येईल. अन्यथा १९९० किंवा २००० सालाची पुनरावृत्ती होईल, असा इशाराही प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी दिला.

## बाणेर टेकडीवर नागालँडच्या तरुणींना लुटण्याचा प्रयत्न




**पुणे** : शहरातील बाणेर टेकडीवर फिरायला गेलेल्या नागालँड राज्यातील तीन तरुणींना धारदार कोयत्याचा धाक दाखवून त्यांच्याकडील मोबाइल फोन, तसेच रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून पसार झालेल्या चोरट्याला पोलिसांनी जेरबंद केले. तसेच त्याच्या दोन अल्पवयीन साथीदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

द्रापेत उर्फ विशाल प्रभाकर समुखराव (वय १९, रा. कुंभार चाळ, बोराडेवाडी, चिखली, मूळ रा. म्हाळुंगी, ता. चाकूर, जि. लातूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी आरोपी सोबत असलेल्या दोन अल्पवयीनांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून दुचाकी आणि कोयता हस्तगत करण्यात आला आहे.

बाणेर टेकडीवर १३ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी अबिनीयू खांगबबो चवांग (वय ३६, सध्या रा. रोहन निल सोसायटी, बाणेर), तिची मैत्रीण चिंगमलिऊ पामेई, अपर पामेई फिरण्यास गेल्या होत्या. त्यावेळी आरोपी विशाल आणि त्याच्याबरोबर असलेल्या दोन अल्पवयीन साथीदारांनी तीन जणीना धारदार कोयत्याचा धाक दाखवून त्यांच्याकडील महागडे मोबाइल फोन, इअर बड्स, बॅग असा मुद्देमाल चोरला होता. अबिनीयू, चिगमलिऊ, अपर मूळच्या नागालँडमधील आहेत. अबिनीयू आणि चिगमलिऊ एका बीपीओत कामाला आहेत. चोरट्यांनी कोयत्याचा धाकाने त्यांना लुटल्यानंतर घाबरलेल्या तीन जणींनी पोलिसांकडे धाव घेऊन तक्रार नोंदविली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली.

याबाबत पोलिसांनी तपास सुरू केला. बाणेर टेकडीवर यापूर्वी देखील नागालँड राज्यातील तरुण आणि त्याच्या मित्राला लुटण्यात आले होते. याप्रकरणात पोलिसांनी चोरट्यांना अटकही केली होती. तांत्रिक तपासात आरोपी विशाल आणि साथीदारांनी चोरीचा गुन्हा केल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्यांना पकडले. पोलीस उपायुक्त हिंमत जाधव, सहायक आयुक्त अनुजा देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी, गुन्हे शाखेचे निरीक्षक विजयानंद पाटील, उपनिरीक्षक प्रवीण चौगले, हवालदार श्रीकांत वाघवले, बाबुलाल तांदळे, सुधाकर माने, इरफान मोमीन, बाबा दांगडे, श्रीधर शिर्के यांनी ही कारवाई केली.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ ऑक्टोबर २०२४


## मद्रास हायकोर्टाने म्हटले- राज्यपाल मंत्रिमंडळाचे निर्णय स्वीकारण्यास बांधील




**चेन्नई :** मद्रास हायकोर्टाने गुरुवारी सांगितले की, राज्यपाल मंत्रिमंडळाचे निर्णय स्वीकारण्यास बांधील आहेत. ते मंत्रिमंडळाचे निर्णय बदलू शकत नाहीत. पुझल तुरुंगात २० वर्षांची शिक्षा भोगत असलेल्या कैदी वीरभारतीच्या याचिकेवर सुनावणी करताना मद्रास उच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली.

वीरभारतीने त्यांच्या चांगल्या वागणुकीचा दाखला देत राज्य सरकारकडे लवकर सुटका करण्याची मागणी केली होती. स्टॅलिन मंत्रिमंडळाने वीरभारतीच्या लवकर सुटकेला मंजुरी दिली, परंतु राज्यपाल आर. एन. रवी यांनी राज्य सरकारच्या निर्णयाला स्थगिती दिली. त्यांनीच वीरभारतीला उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यास सांगितले होते.

याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती एसएम सुब्रमण्यम आणि न्यायमूर्ती शिवग्नन्नम यांच्या खंडपीठाने सांगितले की, राज्यपाल आरएन रवी यांना याप्रकरणी कोणताही वैयक्तिक, नैतिक अधिकार नसावा. प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वीरभारतीला अंतरिम जामीन देण्याचा निर्णय खंडपीठाने दिला.

वीरभारती म्हणाले- उर्वरित गुन्हेगारांची सुटका थांबलेली नाही वीरभारती यांनी आपल्या याचिकेत म्हटले आहे की, अशाच गुन्ह्यांमध्ये शिक्षा झालेल्या अन्य कैद्यांची मुदतपूर्व सुटका करण्यात आली. राज्य समितीने यापूर्वी सखोल चौकशी केली होती.

यानंतर माझ्या सुटकेची शिफारस आवश्यक कागदपत्रांसह मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्यात आली. मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर हे प्रकरण राज्यपालांकडे पाठवण्यात आले, परंतु त्यांनी सोडण्यास नकार दिला.

तामिळनाडूचे राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यातील संघर्षाची शेवटची २ प्रकरणे

१२ फेब्रुवारी २०२४: तामिळनाडूच्या राज्यपालांनी विधानसभेतून सभात्याग केला. राज्य विधानसभेच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यपाल आर.एन.रवी यांनी भाषण न वाचताच दोन मिनिटांत सभागृह सोडले. अवघ्या एका मिनिटाच्या भाषणात राज्यपाल रवी म्हणाले की, राष्ट्रगीताला मान देण्याची माझी विनंती वारंवार दुर्लक्षित करण्यात आली. तसेच, या भाषणात अनेक भाग आहेत, जे वस्तुस्थितीनुसार योग्य नाहीत. त्यामुळे नैतिकदृष्ट्या मी त्यांच्याशी असहमत आहे.

९ जानेवारी २०२३: राज्यपालांनी सरकारच्या भाषणातील काही भाग वाचले नाहीत गेल्या वर्षीही राज्यपाल आरएन रवी विधानसभेतील भाषणादरम्यान सभागृह सोडून गेले होते. वास्तविक, अधिकृत भाषण द्रमुकने तयार केले होते, परंतु आरएन रवी यांनी भाषणातील काही भाग सोडला होता. पेरियार, बीआर आंबेडकर, के कामराज, सीएन अण्णादुराई आणि के करुणानिधी यांसारख्या नेत्यांची नावे असलेल्या विभागांचा त्यांनी उल्लेख केला नाही.

यानंतर मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी केवळ अधिकृत भाषणे रेकॉर्ड करण्याचा प्रस्ताव मांडला. यानंतर राज्यपाल सभागृहातून निघून गेले.

गव्हर्नर आणि स्टॅलिन यांच्यातील वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला

तामिळनाडूचे राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यातील वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये, राज्यपालांनी विधेयके रखडल्याप्रकरणी सुनावणी झाली. केरळ आणि तामिळनाडू सरकारने या विधेयकावर स्वाक्षरी न केल्याची तक्रार करून याचिका दाखल केल्या होत्या.

तामिळनाडू सरकारच्या याचिकेवर न्यायालयाने म्हटले की, राज्य सरकारच्या याचिकेवर आम्ही राज्यपालांना नोटीस पाठवत नाही तोपर्यंत राज्यपाल आर.एन. रवी यांनी दहा विधेयकांना मंजुरी दिली नाही. ही विधेयके तीन वर्षांपासून प्रलंबित होती, तीन वर्षे राज्यपाल काय करत होते? बिलांवर कारवाई न होणे ही गंभीर बाब आहे.

सुप्रीम कोर्टाने राज्यपाल आणि राज्य सरकारला एकत्र बसून परस्पर समस्या सोडवण्यासाठी चर्चा करण्याचा सल्ला दिला होता.

## मातोश्री विद्यालयाच्या २ संघांची राज्यस्तरीय सामन्यासाठी निवड



**महागाव :** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन द्वारा आयोजित शालेय थ्रो बॉल स्पर्धेत १४ व १९ वयोगटातील दोन संघ विभागीय सामन्यात खेळून अतिशय चुरशीचा विजय मिळवला व राज्यस्तरावर खेळण्याची संधी प्राप्त केली.

१४ वर्ष संघाचे नेतृत्व साहिल खोषे, शिवकृष्ण गावंडे, रोहित वानखेडे, रुद्रवीर राऊत, पवन राऊत, सोहम पतके, योगेश चव्हाण, कृष्णा वळसे, गौरव अखाडकर, समर्थ शिंदे, रुद्र हिरेकर, अंशतोश पवार ह्या वयोगटाच्या संघाने आपले वर्चस्व स्थापन करून राज्यस्तरीय खेळाची संधी प्राप्त केली. १९ वर्षे वयोगटातील कर्णधार म्हणून भार्गव रानडे ह्याने अतिशय चुरशीत संघ तयार करून विजय मिळवला.

संघामध्ये खेळाडू धनंजय दारव्हेकर, ओंकार नेवारे, प्रणव भिमटे, कृष्णा लांडगे, हरीश जाधव, वृषभ खरतडे, वेदांत हिंगाडे, अमन शेख, अनिरुद्ध पाईकराव, श्री खोषे, दुर्गेश घोडे, हे खेळाडू अतिशय जिद्दीने खेळून विभागात क्रमांक मिळून राज्यस्तरावर खेळण्याची संधी प्राप्त केली. खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत असून संस्थेचे संस्थापक दिगंबर जगताप ह्यांनी खेळाडूंचे कौतुक करून पुढील खेळास शुभेच्छा दिल्या, प्राचार्य व समस्त कर्मचारी यांनी खेळाडूंना राज्यस्तरीय सामने विजयश्री व्हावो या सदिच्छा विजयी संघास मान्यवरांनी यावेळी दिल्या.









## जयभवानी च्या विशाल पटेकर ची रनिंग मध्ये विभागीय स्पर्धेसाठी निवड



**पाटोदा** दि. : १८ ऑक्टोबर:येथिल जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाचा विद्यार्थी विशाल आनंद पटेकर यांने शालेय क्रिडा स्पर्धेत ८०० मीटर रनिंग स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम येऊन जिल्हा स्तरावर सर्व द्वितीय येऊन त्याची विभागीय रनिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

म्हणुन महाविद्यालयात त्याचा प्राचार्य डॉ.विश्वास कदम, कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.सतिश जरांगे, प्रा.सोमनाथ घाडगे व कनिष्ठ विभागाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा.गोपाळ धांडे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी प्रा.अंतर्गत गुणवत्ता मुल्यमापन हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक ,प्रा.श्रीमती कल्पना घारगे,प्रा.डॉ.वंदन जाधव आदि प्राध्यापक उपस्थित होते,विशाल पटेकर यांची विभागीय स्पर्धेतसाठी निवड झाल्याबद्दल विशाल पटेकरचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा.श्री.शिवाजीराव दादा पंडित, अध्यक्ष मा.श्री. अमरसिंह पंडित, सचिव मा.श्री.जयसिंह पंडित, मा.श्री विजयसिंह पंडित, युवा नेते मा.श्री.रणवीर काका पंडित, मा.श्री. पृथ्वीराजे पंडित, श्री.अमृत डावकर सर, श्री.प्रमोद गोरकर सर,श्री.हाताटे सर, श्री.दिलीपराव जाधव, प्राचार्य डॉ.विश्वास कदम व सर्व. प्राध्यापकांनी अभिनंदन करून विभागीय स्पर्धेतसाठी विशाल ला शुभेच्छा!दिल्या आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ ऑक्टोबर २०२४


## डॉ. सौ. इं. भा. पा. महिला महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात ग्रंथालय व आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग तसेच वाङ्मय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी "वाचनातून व्यक्तिमत्व विकास " या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख व सुप्रसिद्ध लेखिका प्रा. डॉ. लीला शिंदे या लाभल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, वाङ्मय मंडळ सदस्या डॉ. मीनाक्षी देव, ग्रंथपाल ज्योत्स्ना जावळे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक प्रा. माधुरी भावसार, संस्कृत विभाग प्रमुख डॉ. मीनल श्रीगिरीवार, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. महानंदा दळवी व्यासपीठावर उपस्थित होत्या.

व्यक्तिमत्व विकासासाठी सर्वप्रथम एक उत्तम वाचक असणे अतिशय आवश्यक आहे. जो उत्तम वाचक आहे असाच व्यक्ती विविध विषयाच्या ज्ञानाने परिपूर्ण होऊन स्वत:मध्ये अपेक्षित असेल सकारात्मक बदल घडवून आणण्यास समर्थ ठरतो. वाचनाने वैचारिक प्रगल्भता वाढून ती व्यक्तीच्या आचरणातही प्रतिबिंबित होते. याचबरोबर डॉ. अब्दुल कलाम, कार्व्हर , महात्मा गांधीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या थोर विचारवंतांची पुस्तके निश्चितच वाचावी असे प्रतिपादन प्रमुख अतिथी डॉ. लीला शिंदे यांनी केले.

वाचन सप्ताह निमित्त महाविद्यालयात निबंध स्पर्धा, पुस्तक वाचन तसेच श्रमदान अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, या सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले.

यात सर्वप्रथम निबंध स्पर्धेत वरिष्ठ विभागातून कु. कल्याणी लोखंडे हिने प्रथम पारितोषिक कु. भाग्यश्री नंद द्वितीय पारितोषिक कु. राणी मनचरे हिने तृतीय पारितोषिक पटकावले. कनिष्ठ महाविद्यालयातून कु. भार्गवी मोदी हिने प्रथम क्रमांक , कु. राधिका दैठणकर द्वितीय क्रमांक, कु. श्रुती बुट्टे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच या निमित्ताने आयोजित वाचन महोत्सवात कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण ४० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हि स्पर्धा यशस्वी केली.

वाचन महोत्सवात श्रमदानाचेही आयोजन करण्यात आले होते, त्यात एकूण १७ विद्यार्थी / विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला व महाविद्यालयाची स्वच्छता करून वाचनाबरोबरच श्रमाचेही संस्कार विद्यार्थ्यांवर रुजवण्यात आले.कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करत असताना प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी “आजच्या काळात मोबाईलच्या अतिवापरामुळे वाचनाचे महत्त्व कमी होत असून ते रुजवणे ही काळाची गरज आहे असे मत मांडले.”

तसेच वाङ्मय मंडळाचे उद्घाटन झाले असे घोषित केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. भाग्यश्री नंद, प्रमुख अतिथींचा परिचय कु. राणी मनचरे या विद्यार्थिनींनी करून दिला, प्रास्ताविक ग्रंथपाल ज्योत्स्ना जावळे यांनी, तर आभार प्रगटन मराठी विभाग प्रमुख डॉ. मीनाक्षी देव यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## परमेश्वराने दिलेला अमूल्य देह जपा; व्यसने, दुर्गुणांचा त्याग करा : इंदुरीकर महाराज



**गोजोरे (ता.भुसावळ) :** अभ्यासापेक्षा श्रेष्ठ ज्ञान आहे. ज्ञानापेक्षा श्रेष्ठ ध्यान आहे. ज्या परमेश्वराने आपल्याला देह दिला आहे, त्याचे भजन करायला हवे. गाव पुढाऱ्यांनी शाळेकडे लक्ष द्यायला पाहिजे. शाळेचे मंदिर व्हायला हवे, अशी अपेक्षा प्रबोधनकार तथा ख्यातनाम कीर्तनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी व्यक्त केली.

गोजोरे (ता.भुसावळ) येथे कै. सुशिलाबाई देवचंद तळेले यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त पुंडलिक देवचंद तळेले, विठ्ठल देवचंद तळेले व ज्ञानेश्वर देवचंद तळेले परिवाराने बुधवारी रात्री इंदुरीकर महाराजांचे कीर्तन आयोजित केले होते.

त्यांनी दारूबंदीसह व्यसनमुक्तीवर प्रबोधन केले. शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले की, अभ्यासापेक्षा श्रेष्ठ ज्ञान आहे. ज्ञानापेक्षा श्रेष्ठ ध्यान आहे. ज्या परमेश्वराने आपल्याला देह दिला आहे. त्याचे भजन करायला हवे. गावपुढाऱ्यांनी आधी शाळांकडे लक्ष द्यावे. शाळेचे मंदिर झाल्यास गावाचे चित्र बदलेल. मोठमोठे अधिकारी जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकून मोठे झाले. हल्ली कॉलेजची मुले विविध प्रकारचे मोबाईल गेम खेळून व शेअर बाजारात भिकारी झाले. गावातील अनेक तरुण दारूच्या व्यसनात बुडाले आहेत.

अनेकदा बापाच्या खांद्यावर मुलाची तिरडी जाताना पाहून वेदना होतात. त्यामुळे दारू पिऊन संसार आणि आयुष्य उद्ध्वस्त करू नका. आणि दारू प्यायचीच असेल तर लग्न करून कुण्या मुलीचे आयुष्य बरबाद करु नका. तसेच शेतकऱ्यांनी शेतीसोबत कोणताही जोडधंदा करावा, जेणेकरून आर्थिक अडचणी येणार नाहीत. कीर्तनाला पंचक्रोशीतील हजारो नागरिक उपस्थित होते. त्यात महिलांची संख्या लक्षणीय होती.






## संजय राऊत रोज सकाळी दांडकी गोळा करून बडबडतात - आमदार शहाजी बापू पाटील



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत रोज सकाळी दांडकी गोळा करून बडबड करतात. त्यातून त्यांनी अवघ्या महाराष्ट्राला भांबावून सोडले आहे, अशी टीका शिवसेना आमदार शहाजी बापू पाटील यांनी केली आहे.

शहाजी बापू पाटील हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार आहेत. शिवसेनेतील बंडावेळी 'काय झाडी, काय डोंगार' हा त्यांचा डायलॉग फारच फेमस झाला होता. त्यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना खासदार संजय राऊत यांच्यावर सडकून टीका केली. ते म्हणाले, संजय राऊत रोज सकाळी दांडकी गोळा करून बडबड करत आहेत. ते रोज महाराष्ट्राला भांबावून सोडण्याचे काम करतात. खऱ्या बापाचे असल्यासारखे त्यांनी एका शब्दावर ठाम रहावे.

संजय राऊत यांना खासदार होण्यासाठी आम्ही एवढी वर्षे मतदान केले. ते एवढ्या वर्षांपासून खासदार आहेत. पण त्यांनी आतापर्यंत खासदार निधीतून कुठेही काम केल्याचे दिसत नाही. त्यांनी केलेले एखादे काम दाखवून द्या. ते आपल्या कामाबद्दल बोलत नाहीत. ते यावर बोलले तर त्यांचे तोंड कायमचे बंद होईल.

## हिंगोली जिल्ह्यात एकही वाहन विना तापसणी प्रवेश करणार नाही : पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे

**हिंगोली :** जिल्ह्यात एकही वाहन विना तपासणी प्रवेश करणार नाही, यावर विशेष लक्ष दिले जाणार असून त्यासाठी लगतच्या जिल्ह्यातील पोलिस प्रमुखांसोबत चर्चा करून एकत्रितरित्या तपासणी नाके सुरु केले जाणार असल्याची माहिती पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोकाटे यांनी सांगितले की, जिल्ह्यातील तीनही विधानसभेची निवडणूक निर्भयपणे पार पडावी तसेच मतदारांना कुठल्याही प्रकारचे आमिष दाखविले जाणार नाही, यासाठी पोलिस दलास सतर्कतेचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्ह्यात बंदोबस्तासाठी एक सीमा सुरक्षा दलाची कंपनी दाखल झाली असून आणखी काही कंपन्या पुढील काही दिवसांतच दाखल होणार आहेत. त्यासाठी वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

जिल्ह्यात संवेदनशील ठिकाणी तसेच एकाच इमारतीमध्ये तीन किंवा त्यापेक्षा अधिक मतदान केंद्रे आहेत. तसेच गल्लीबोळातील मतदान केंद्रावर सीमा सुरक्षा दलाचे जवान तैनात केले जाणार आहेत. या शिवाय स्थानिक पोलिसांचीही त्या भागात नियमितपणे गस्त राहणार आहे. या शिवाय बंदोबस्तासाठी बाहेर राज्यातील पोलिस कर्मचारी व गृह रक्षक दलाच्या जवानांची मदत घेतली जाणार आहे.

विधानसभा निवडणुकीत मतदारांना प्रलोभन दाखविण्याचा प्रयत्न झाल्यास त्यावर तातडीने कारवाई केली आहे. हिंगोली जिल्ह्याच्या सीमेवर लगतच्या जिल्ह्याच्या पोलिस दला सोबत एकत्रितरित्या तपासणी पथके उभारली जाणार आहेत. त्यासाठी नांदेड, परभणी, वाशीम, यवतमाळ, बुलढाणा, जालना पोलिस दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला जात आहे. त्यांच्यासोबत चर्चेनंतर नियोजन करूनच तपासणी नाके सुरु केले जातील.

जिल्ह्यात येणारे किंवा जिल्ह्यातून बाहेर जाणारे चाकचाकीसह इतर मोठी वाहने तपासणी शिवाय जिल्ह्यात प्रवेश करू शकणार नाहीत किंवा बाहेर जाऊ शकणार नाहीत. तपासणी नाक्यांवरील कर्मचाऱ्यांना याबाबत स्पष्ट सुचना दिल्या जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यात निवडणुकीच्या कालावधीत गुन्हे केलेल्या तसेच इतर गुन्हेगारांवर पोलिस दलाचे लक्ष राहणार आहे. त्यासाठी आठ पथके कार्यरत करण्यात आली असून या पथकांकडे गुन्हेगारांवर लक्ष ठेवणे, त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची जबाबदारी असणार आहे, असेही कोकाटे यांनी सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ ऑक्टोबर २०२४


## आयुर्वेद फक्त भारतापुरता मर्यादित नाही - चंद्रचूड



**दिल्ली** : सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी आयुर्वेदाला निरोगी जीवनासाठी आवश्यक असल्याचे सांगितले. ते म्हणाले- आयुर्वेद हे केवळ भारतापुरते मर्यादित नाही. हा एक नैसर्गिक उपचार आहे. कोविड-१९ दरम्यान त्यांनी ॲलोपॅथीचे औषध घेतले नाही. आयुर्वेदिक उपचारानेच तो बरा झाला.

ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद (AIIA) च्या आंतरराष्ट्रीय परिषदेत गुरुवारी (१७ ऑक्टोबर) CJI यांनी या गोष्टी सांगितल्या. त्यांनी आयुष मंत्रालयाचेही कौतुक केले आणि सांगितले की जागतिक स्तरावर आयुर्वेदिक उपचारांची ओळख वाढविण्यात हे मंत्रालय मोठे योगदान देत आहे.

चंद्रचूड म्हणाले- आयुर्वेद वर्षानुवर्षे उपचार देत आहे, ते वैयक्तिक त्याचे समर्थक आहेत CJI म्हणाले की त्यांचे कुटुंबीय देखील आयुर्वेदिक उपचारांवर विश्वास ठेवतात. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्यावर आयुर्वेदिक उपचार सुरू आहेत. चंद्रचूड पुढे म्हणाले- त्यांना वैयक्तिकरीत्या ते आवडते. कोविड-१९ च्या दरम्यान त्यांना बरे होण्यासाठी थोडा वेळ लागला, परंतु कोणताही दुष्परिणाम न होता ते बरे झाले. ते निरोगी शरीरासाठी आयुर्वेद आवश्यक मानतात.

**चंद्रचूड यांनी पंतप्रधान मोदींच्या दूरदृष्टीचे कौतुक केले**

भारताच्या सरन्यायाधीशांनीही पंतप्रधान मोदींच्या दूरदृष्टीचे कौतुक केले. आयुष मंत्रालयाचे कौतुक करताना ते म्हणाले की, मंत्रालय आज आयुर्वेदाची जागतिक ओळख अधिक मजबूत करत आहे. G२०, BRICS आणि इतर परिषदांमध्येही आम्ही मंत्रालयाचे नेतृत्व पाहिले. हे नैसर्गिक उपचार आणि लोकांच्या आरोग्य आणि विकासासाठी योगदान देत आहे.

**AROHA २०२४ परिषदेत ७४ देशांचा समावेश**

ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद (AIIA) च्या ८ व्या स्थापना दिन AROHA २०२४ परिषदेमध्ये तीन दिवसांच्या कार्यशाळा सत्रांसह १५ वैज्ञानिक सत्रे असतील. ज्यामध्ये ४०० हून अधिक शोधनिबंध सादर केले जाणार आहेत. AIIA च्या लंडन स्कूल ऑफ हायजीन अँड ट्रॉपिकल मेडिसिन, FIGZ जर्मनी, AIST जपान, वेस्टर्न सिडनी युनिव्हर्सिटी ऑस्ट्रेलिया, UHN कॅनडा आणि राष्ट्रीय संस्थांसह ७४ हून अधिक देश या परिषदेत सहभागी होत आहेत.

**आयुष मंत्रालयाची सुरुवात २०१४ मध्ये झाली**

नैसर्गिक उपचारांच्या भारतीय संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी ९ नोव्हेंबर २०१४ रोजी आयुष मंत्रालय सुरू करण्यात आले आहे. यापूर्वी, १९९५ मध्ये स्थापन करण्यात आलेला भारतीय वैद्यकीय प्रणाली आणि होमिओपॅथी विभाग (ISM&H) त्याच्या विकासासाठी कार्यरत होता. मंत्रालयाचे काम आयुर्वेद, योग, युनानी आणि होमिओपॅथीला प्रोत्साहन देणे आहे. शिवाय त्याला शिक्षणाची जोड द्यावी लागेल. मंत्रालयाच्या देशात १२ राष्ट्रीय संस्था आणि ५ संशोधन संस्था आहेत.

## अजित पवारांच्या त्रासाला कंटाळून भाजपला सोडचिट्ठी - लक्ष्मण ढोबळेंची घोषणा

**सोलापूर** : विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुतीला धक्क्यावर धक्के बसत आहेत. काही दिवसांपूर्वी भाजपचे नेते हर्षवर्धन पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला होता. आता मोहोळमधील भापज नेते लक्ष्मण ढोबळे हातात तुतारी घेणार आहे. अजित पवार यांच्या त्रासाला कंटाळून शरद पवार गटात जात असल्याचे ढोबळे यांनी सांगितले. मी दोन दिवसांत भाजपला राजीनामा पाठवून देतोय, असेही ते म्हणाले.

विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यापासून अनेक इच्छुक नेते संधीसाठी पक्षांतर करत आहेत. भाजमध्ये असलेले लक्ष्मण ढोबळे हे सुद्धा मोहोळ मतदारसंघातून विधानसभा लढवण्यास इच्छुक आहेत. पण राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विठ्ठल माने हे मोहोळचे विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे महायुतीच्या जागावाटपात ही जागा अजित पवार गटाला सुटणार असल्याने लक्ष्मण ढोबळे यांनी संधी मिळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे लक्ष्मण ढोबळे यांनी भाजपला सोडचिट्ठी देत तुतारी फुंकण्याचा निर्णय घेतल्याचे म्हटले जात आहे. लक्ष्मण ढोबळे गुरुवारी मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांची भेट सुद्धा घेतली.

काय म्हणाले लक्ष्मण ढोबळे? अजित पवारांच्या त्रासाला कंटाळून मी राष्ट्रवादी सोडली आणि भाजपमध्ये आलो. पण आता अजित पवारही भाजपसोबत आले आणि पुन्हा त्रास देऊ लागले. अजित पवारांच्या त्रासाला कंटाळून आता पुन्हा भाजप सोडत असल्याचे लक्ष्मण ढोबळे म्हणाले. पैशांच्या जीवावर राजकारण करता येते, असे अजित पवारांना वाटते. मात्र तसे होत नाही. तुमच्या काकांनी कसे राजकारण केले ते पहा, असा सल्ला लक्ष्मण ढोबळे यांनी अजित पवारांना दिला आहे.

...तरीही राष्ट्रवादी प्रवेश नक्की

मी दोन दिवसांमध्ये माझा राजीनामा भाजपला पाठवून देणार असून शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करत असल्याचे त्यांनी सांगितले. मला मोहोळ मतदारसंघातून उमेदवारी नाही मिळाली तरी चालेल, पण आता राष्ट्रवादी प्रवेश नक्की आहे, असेही ते एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले. लक्ष्मण ढोबळे आधी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. २०१९ मध्ये त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. आता पुन्हा ते राष्ट्रवादीत घरवापसी करणार आहेत.

शरद पवारांकडे नेत्यांची रांग

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शरद पवार गटात जोरदार इनकमिंग सुरू झाले आहे. भाजपचे हर्षवर्धन पाटील, अजित पवार गटाचे दीपक चव्हाण बबन तसेच फलटण येथील निंबाळकर गटाने शरद पवारांच्या राष्ट्रवादीत नुकताच प्रवेश केला आहे. तर माढ्याचे आमदार बबन शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी शरद पवारांची भेट घेतली होती. त्यामुळे ते देखील तुतारी फुंकण्याच्या तयारीत असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे यश पाहता लोकांचा शरद पवारांवर विश्वास वाढला असे, पक्षाच्या नेत्यांकडून सांगितले जात आहे.

## विनयभंगातील आरोपीचा पक्ष न पाहता अटक करा : राज ठाकरे

**ठाणे** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शुक्रवारी दुपारी ठाण्यातील विनयभंग झालेल्या एका पीडित अल्पवयीन मुलीच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी आरोपीचा पक्ष न पाहता त्याच्या मुसक्या आवळण्याची मागणी केली. राज ठाकरे यांच्या या भूमिकेमुळे या प्रकरणाच्या तपासाला वेग मिळण्याची शक्यता आहे.

ठाण्यातील भंडार आळीत एका ११ वर्षीय मुलीचा विनयभंग झाला होता. या प्रकरणी सत्ताधारी शिवसेनेच्या सचिन यादव नामक एका उपविभागप्रमुखाचे नाव पुढे आले होते. त्याच्यावर कडक कारवाई करण्यासाठई महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह नागरिकांनी गुरुवारी मोर्चा काढला होता. हा मोर्चा ठाणे स्टेशन भंडार आळी ते मासुंदा तलावालगतच्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात आला. यावेळी आरोपीवर अतिरिक्त कलमे लावून त्याला मंगळवारपर्यंत अटक करण्यात आली नाही तर ठाणे बंदची हाक दिली जाईल असा इशारा देण्यात आला.

या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी शुक्रवारी आपल्या ठाणे दौऱ्यात पीडित मुलीच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी आरोपीचा पक्ष कोणता हे न पाहता त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. ते म्हणाले, माझे पोलिसांशी बोलणे झाले आहे. बदलापूरसारखे तुम्ही हे प्रकरण अंगावर घेऊ नका. आरोपी कोणत्या पक्षाचा पदाधिकारी आहे हे महत्त्वाचे नाही. कारण, कोणत्याही पक्षाची कधी अशी भूमिका नसते. पण एखाद्या पक्षाने आपल्या कार्यकर्त्याच्या विकृतीवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला, तर आरोपी कोणत्याही पक्षाचा असला तरी त्याला अटक झाली पाहिजे. विनयभंगाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर न्यायालय आरोपीला जामीन देतेच कसा? या प्रकरणी पीडित मुलीचा जबाब नोंदवून आरोपीला तत्काळ अटक करा असे मी पोलिसांना सांगितले आहे.

**मनसे आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्या**

राज ठाकरे म्हणाले, सरकारने टोलमुक्तीचे आंदोलन करणाऱ्या मनसे कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घ्यावेत. हे आंदोलन आम्ही घरच्या सत्यनारायणासाठी केले नव्हते. ते आंदोलन आम्ही जनतेसाठी केले होते. टोलमुक्ती मिळाल्यानंतर आज सर्वजण आनंदी असतील. पण एवढी वर्षे टोलधाड आपल्यावर पडली, टोलचे किती पैसे जमा झाले, ते कुणाकडे गेले याची कोणताही कल्पना नव्हती. आमचा पक्ष एवढ्या वर्षांपासून याविरोधात आंदोलन करत आहे. त्याला आता यश आले आहे. त्यामुळे माझ्या सर्व कार्यकर्त्यांचे काम अभिनंदनीय आहे, असेही राज ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले.


